संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य - २०१९ युवा महोत्सवामध्ये विद्यापीठ चमूचे घवघवीत यश

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ युवा महोत्सव चमू गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दिनांक २ ते ६ डिसेंबर, २०१९ या कालावधित संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य - २०१९ युवा महोत्सवामध्ये सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमूने व चमूतील कलावंतांनी दर्जेदारपणे आपल्या कलांचे सादरीकरण करुन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला नावलौकिक मिळवून दिला.

पाश्चिमात्य समूहगान कला प्रकारात चमूने प्रथम क्रमांक पटकाविला असून त्यामध्ये श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची कु. वैष्णवी शुक्ला, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीची कु. वैष्णवी निंभोरकर, प्रो. राम मेघे तांत्रिकी व संशोधन संस्था, बडनेरा रेल्वेची कु. वैष्णवी ठाकुर, महिला महाविद्यालय, अमरावतीची कु. ऐश्वर्या खंडारे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीची कु. वैदेही खेडकर, श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांवची कु. शताक्षी देशमुख हिचा, तर साथीदार मध्ये अमरावतीचा अभिजित भावे व जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा रेल्वेचा वैभव युवतकर याचा समावेश आहे.

भारतीय समूहगान कला प्रकारात चमूने द्वितीय क्रमांक पटकाविला असून त्यामध्ये श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची कु. वैष्णवी शुक्ला, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीची कु. वैष्णवी निंभोरकर, प्रो. राम मेघे तांत्रिकी व संशोधन संस्था, बडनेरा रेल्वेची कु. वैष्णवी ठाकुर, महिला महाविद्यालय, अमरावतीची कु. ऐश्वर्या खंडारे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीची कु. वैदेही खेडकर, श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांवची कु. शताक्षी देशमुख हिचा, तर साथीदार मध्ये श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळचे डॉ. निखीलेश नलोडे व अमरावतीचे प्रशांत ठाकरे यांचा समावेश आहे.

पाश्चिमात्य गायन प्रकारात चमूने द्वितीय क्रमांक पटकाविला असून त्यामध्ये श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची कु. वैष्णवी शुक्ला हिचा, तर साथीदार मध्ये अमरावतीचा अभिजित भावे व जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा रेल्वेचा वैभव युवतकर याचा समावेश आहे. शास्त्रीय वाद्य संगीत (ताल वाद्य) मध्ये चमूने तृतीय क्रमांक पटकाविला असून त्यामध्ये सिताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा आदिनाथ धुमाळे याचा, तर साथीदार मध्ये श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळचे डॉ. निखीलेश नलोडे यांचा समावेश आहे. शास्त्रीय नृत्यामध्ये चमूने तृतीय क्रमांक पटकाविला असून त्यामध्ये श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांवची कु. वैदेही गावंडे हिचा, छायाचित्रीकरणामध्ये चमूने तृतीय क्रमांक पटकाविला असून त्यामध्ये दि कॉलेज ऑफ ॲनिमेशन, बायो-इंजि. ॲन्ड रिसर्च सेंटर, अमरावतीचा आदित्य घाटोळे, वक्तृत्व मध्ये चमूने तृतीय क्रमांक पटकाविला असून त्यामध्ये अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अकोलाची कु. साकिना अली हिचा, तर मिमीक्री मध्ये चमूने तृतीय क्रमांक पटकाविला असून त्यामध्ये दि कॉलेज ऑफ ॲनिमेशन, बायो-इंजि. ॲन्ड रिसर्च सेंटर, अमरावतीचा पवन नागपूरे याचा समावेश आहे.

इंद्रधनुष्य - २०१९ युवा महोत्सवामध्ये उर्वरित कलाप्रकारांचा सहभाग सुद्धा अप्रतिम ठरला असून चमूला चमू व्यवस्थापक म्हणून श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीच्या डॉ. सुवर्णा गाडगे व श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळचे डॉ. निखिलेश नलोडे यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. या गौरवास्पद कामगिरीबद्दल विद्यापीठाच्यावतीने विजेत्या कलावंतांचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी अभिनंदन केले.

विद्यापीठाची युवा महोत्सव चमू जिवाजी विद्यापीठ, ग्वॉलियर येथे संपन्न होणाऱ्या मध्य विभाग युवा महोत्सव स्पर्धेमध्ये सहभागी होणार असून त्याठिकाणी सुद्धा आपल्या कलांचे दर्जेदारपणे सादरीकरण करुन विद्यापीठाला नावलौकिक मिळवून देतील, अशी आशा आहे. या कलावंतांनी नुकतेच विद्यार्थी भवनात रंगीत तालीम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. यावेळी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, व्य.प. सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, विद्यार्थी विकास संचालक डॉ. दिनेश सातंगे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे, माजी सहसंचालक डॉ. भोजराज चौधरी, सदस्य डॉ. रेखा मग्गीरवार, रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे आदी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १६/१२/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी